सामान्य प्रशासन विभाग
**जाहीरात क्रमांक : ०२ /२०२६**
दिनांक :१२/०४/२०२६

# कोल्हापूर महानगरपालिका

## जाहीर प्रसिध्दीकरण

कोल्हापूर महानगरपालिकेत खालील संवर्गातील पद ठोक मानधन व कंत्राटी तत्वावर भरणेकरीता समक्ष उमेदवारांना मुलाखतीस बोलविणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| पदाचे नांव | :- | जिम्नॅशियम कोच कम क्लार्क **(सर्वसाधारण महिला)** |
| मानधन | :- | रु. २२६१०/- दरमहा ठोक मानधन |
| पदसंख्या | :- | ०१ |
| शैक्षणिक अर्हता | :- | अ) उमेदवार कला शाखेचा पदवीधर व तो पतियाला येथील राष्ट्रीय क्रिडा संस्थेतील परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>किंवा<br>सैनिक शाळेतील शारीरीक प्रशिक्षक उत्तीर्ण.<br>किंवा<br>सैनिक शाळेतील खेळाचे प्रशिक्षण उत्तीर्ण (ए.पी.टी.सी )<br>किंवा<br>कला शाखेचा पदवीधर आणि व्यायाम शाळेतील शिक्षकाचा पाच वर्षाचा अनुभव. |

### उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना :

| | |
|---|---|
| १) | वरील पदासाठीची शैक्षणिक अर्हता व अनुभव असलेस दि.१५/०४/२०२६ ते दि.२४/०४/२०२६ रोजी अखेर **कोल्हापूर महानगरपालिका, मुख्य इमारत, नोंदणी (ब्युरो) विभाग येथे सकाळी १०:०० वा. ते सायंकाळी ६.१५ वा. (कार्यालयीन सुट्टी वगळून)** या कार्यालयीन वेळेत आवश्यक त्या कागदपत्रासह विहीत नमुण्यात अर्ज सादर करणेचा आहे. |
| २) | सदर पदाकरिता प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करुन पात्र/अपात्र होणाऱ्या उमेदवारांची यादि प्रसिध्द करून पात्र उमेदवार यांची अंतिम गुणानुक्रम यादीतील प्रथम पाच (०५) उमेदवारांना कागदपत्रे तपासणीसाठी/मुलाखतीस बोलवणेत येईल.याबाबत स्वतंत्रपणे यादी म.न.पा.संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल. |
| ३) | नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या कालावधीकरीता (६ महिने) (ठोक मानधन) करारतत्वार असून नियुक्ती करणेत आलेल्या उमेदवारास महानगरपालिका सेवेत कायम करणेबाबत कोणत्याही प्रकारे हक्क सांगता येणार नाही. तसेच कोणत्याही मा. न्यायालयात मनपा सेवेत कायम करणेबाबत कायदेशीर दाद मागता येणार नाही. |
| ४) | नियुक्ती करणेत आलेल्या उमेदवारास अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार रु.१००/- चे स्टॅप पेपरवर लिहून द्यावा लागेल. |
| ५) | सदर उमेदवारांवर कोणत्याही पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोद नसलेबाबतचे रु.१००/- चे स्टॅपपेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे. |
| ६) | सदरची नियुक्ती ही केवळ ६ महिने कालावधीकरीता असलेने नियुक्त होणाऱ्या उमेदवार यांची करार समाप्त झालेनंतर करार नुतनीकरण करणेबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, को.म.न.पा. यांना राहतील. |

| | |
|---|---|
| ७) | नियुक्तीनंतर सेवा सोडून जावयाचे असलेस किमान १ महिना अगोदर लेखी सुचना देणे आवश्यक राहील. किंवा १ महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम को.म.न.पा. फंडात जमा करावी लागेल. |
| ८) | सदर पदाची नियुक्ती ही तात्पुरत्या कालावधीकरीता (६ महिने) करार पत्राच्या अधिन असेल. |
| ९) | **अर्ज सादर करणेपूर्वी जाहीरातीमध्ये दर्शविलेली शैक्षणीक अर्हता व अनुभव अटी पूर्ण करतात. याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी व त्यानंतरच अर्ज सादर करावा.** |
| १०) | जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या पदाची कमाल वयोमर्यादा जाहिरात दिनांकास ४५ वर्षे इतकी राहील. |
| ११) | या जाहीरातीत नमूद केलेली पदसंख्या कमी-जास्त/रद्द होणेची शक्यता नाकारता येत नाही. |
| १२) | महिला व्यायामशाळेचे ठिकाण हे सानेगुरुजी वसाहत, रि.स.नं. १०७३ सुर्यवंशी वसाहत म.न.पा हॉल कोल्हापूर. |

स्वाक्षरी/-

मा. आयुक्त यांचे मान्यतेने }

(शिल्पा दरेकर)
**अति.आयुक्त- (२)**
कोल्हापूर महानगरपालिका